परभणी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकरिता वाहने भाडेतत्त्वावर उपलब्ध करुन प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांकः वाहन-०७२६/प्र.क्र.२५४/प्रशा-२

गो. ते. संकुल इमारत, ९ वा मजला
लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१.
तारीखः २८ जुलै, २०२६

वाचा:-

१) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम/भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.
२) उद्योग़ ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र: भाखंस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६.
३) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक वाहन-२०१७/प्र.क्र.४१/१७/विनियम, दिनांक २८.०७.२०२०.
४) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: शापसे-३४२२/प्र.क्र.७८/का.३१, दिनांक ०१.०६.२०२३.
५) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय यांचे पत्र क्र. डीएमईआर-२२०११/१७५/२०२६-प्रोक१, दिनांक ०२.०७.२०२६

प्रस्तावना:-

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी येथे एम. बी. बी. एस. अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उपक्रमांसाठी तसेच विद्यार्थ्यांच्या वसतिगृहापासून महाविद्यालय व संलग्न रुग्णालयापर्यंतच्या दैनंदिन वाहतुकीसाठी बस उपलब्ध असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची वसतिगृहे शहरातील विविध ठिकाणी असल्यामुळे त्यांच्यासाठी समूह वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. यास्तव, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी येथे शैक्षणिक उद्देशासाठी बस भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०१.०६.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या खाजगी सेवापुरवठादारांच्या पॅनलमधील सेवापुरवठादारांकडून शासकीय

वैद्यकीय महाविद्यालय, परभणी यांच्यासाठी प्रत्येकी ४४ आसनी अशा दोन बस भाडेतत्त्वावर उपलब्ध करून घेण्यास तसेच त्यासाठी येणाऱ्या रुपये ५४,००,०००/- (अक्षरी रुपये चौपन्न लाख फक्त) (वस्तू व सेवा कर वगळून) इतक्या वार्षिक खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	संस्थेचे नाव व लेखाशिर्ष	वाहनाचा प्रकार	संख्या	प्रति महिना भाडे (रु.)	वार्षिक भाडे (जी.एस.टी. शिवाय)
१	शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी (२२१०H५६१)	४४ आसनी बस	२	२,२५,०००/-	५४,००,०००/-
	एकूण		**२**		**५४,००,०००/-**

२. सदर वाहनांचे भाडे तसेच त्यावरील वस्तू व सेवा कराचा खर्च शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी (२२१०H५६१) या लेखाशिर्षाखाली "(१३) कार्यालयीन खर्च" या उद्दिष्टांतर्गत उपलब्ध निधीतून भागविण्यात यावा.

३. सदर सेवा उपलब्ध करून घेण्यासाठी संबंधित अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी यांनी सेवापुरवठादाराशी संस्थास्तरावर नियमांनुसार करारनामा करावा.

४. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा झाल्यास अथवा त्यामध्ये नमूद दर, अटी व शर्तींमध्ये बदल झाल्यास तसेच मुदतवाढ देणे किंवा सेवापुरवठादारामध्ये बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाल्यास, त्यानुसार सुधारित आदेश निर्गमित करण्यासाठी संबंधित प्रस्ताव शासनाकडे सादर करावा.

५. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०१.०६.२०२३ च्या शासन निर्णयानुसार पॅनेलमधील सेवापुरवठादारांनी वाहन उपलब्ध करून देण्यास असमर्थता दर्शविल्यास, संबंधित अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांनी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक ०१.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार वाहन भाडेतत्त्वावर उपलब्ध करून घेण्यासाठी संस्थास्तरावर निविदा प्रक्रिया राबवून त्यामधून प्राप्त होणाऱ्या न्यूनतम दरास शासनाची मान्यता प्राप्त करावी.

६. वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक १७.०४.२०१५, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग दोन, अनुक्रमांक-१३, नियम क्र. ६० व ६१ अन्वये प्रशासकीय विभागास असलेल्या वित्तीय अधिकारानुसार सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२८१८०५२०१७५१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MAHADEO GIRDHARI JOGDAND

Digitally signed by MAHADEO GIRDHARI JOGDAND
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDD, 2.5.4.20=0477D837DC0B00FC2CBD45D17D07C625C3417378F97D493A8A277FAA29F65459, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C1D08CFDEE92DA209D709F5456D9EDE95236B8A8E7E2A2801B8FED03DCF793D3, cn=MAHADEO GIRDHARI JOGDAND
Date: 2026.07.28 18:48:57 +05'30'

(म. गि. जोगदंड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार - १/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र,मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, मुंबई.
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
४. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, परभणी.
५. संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी.
६. निवडनस्ती (प्रशा-२).